



# पारनेर दर्शन







वर्ष ३ अंक ११०, मंगळवार २५ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


## विमानतळ, हेलिपॅड आणि इंटरसिटी रेल्वेसाठी लढा

■ खासदार नीलेश लंके यांचा निर्धार ■ खा. लंके यांच्या अध्यक्षतेखाली नगरला महत्वपूर्ण बैठक



■ नगर शहर व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने खा. नीलेश लंके यांची विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक पार पडली.

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**नगर-पुणे इंटरसिटी रेल्वे सेवेबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून ही सेवा लवकरच सुरू करण्यासाठी प्रयत्न आहेत. त्यामुळे औद्योगिक वसाहती, शिक्षण संस्था,आरोग्य सेवा तसेच धार्मिक पर्यटनास चालना मिळेल. नगर-मुंबई हेलिकॉप्टर सेवा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असून जिल्हयासाठी विमानतळाची गरज असल्याने जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी या गोष्टी महत्वपूर्ण असल्याने त्यासाठी लढा दिला जाईल असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी केला.**

नगर शहर व जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आर्किटेक्टस, इंजिनिअर्स ॲण्ड सर्वेअर्स असोसिएशन, द इंस्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स आणि बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत खा. नीलेश लंके यांची नगर शहरात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत खा.लंके यांनी शहर तसेच जिल्ह्याच्या विकासातील अडचणी जाणून घेतल्या व उपाययोजना कशा करता येईल यासंदर्भात या चर्चा करण्यात आली.

या बैठकीत विविध संस्थांनी शहराच्या विकासासमोरील अडथळयांबाबत माहिती दिली. रक्षा मंत्रालयाच्या अटी, पुरातत्व विभागाचे निर्बंध, टाऊन प्लॅनिंगमधील भ्रष्टाचार तसेच रेड आणि ब्लू लाईनसंबंधीच्या नियमांमुळे शहराचा विकास ठप्प होत असल्याचे मुद्दे यावेळी मांडण्यात आले. क्रेडाईच्या प्रतिनिधींनी सिना नदीच्या रेड आणि ब्लू लाईनच्या अटींमुळे बांधकाम आणि शहराचा विस्तार अडखळल्याची तक्रार केली. नगर शहरास पुराचा फारसा धोका नसतानाही हे नियम लागू केल्याने विकास प्रक्रियेत अडथळे येत आहेत. जलसंपदा विभागाकडे हा विषय उपस्थित करून आवष्यक त्या सुधारणा करण्याची यावेळी मागणी करण्यात आली.

एईएसए संस्थेने संरक्षण मंत्रालयाशी संबंधित समस्या मांडल्या. नगर शहर कोणत्याही कन्स्ट्रक्शन झोनच्या यादीत नसतानाही बांधकाम परवानग्या देताना अडचणी येत आहेत. तसेच पुरातत्व विभागाने काही स्मारकांना संरक्षित स्थळांचा दर्जा दिल्यामुळे त्या ठिकाणी विकास कामांवर निर्बंध आल्याकडे यावेळी खा. लंके यांचे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी करण्यात आलेल्या विविध मागण्यांची दखल घेत पुढील उपाययोजना करण्याची ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली. या बैठकीत उपस्थित संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी खा. नीलेश लंके यांनी लोकसभा निवडणूकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.
या बैठकीस या संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये अतुल आत्रे, रामनाथ वैराहर, हरीश इंगळे, अमित मुथा, विनोद काकडे, गिरीश अग्रवाल, आदिनाथ दहीफळे, संजय गुंदेचा, यश शाह, विजयकुमार पाडीर, दीपक दारे, अभय राजे, बबन खैरे, दीपक विधाते, प्रकाश गांधी, दादासाहेब करंजुले, राहुल शिंदे, भारत गोडसे, प्रीतम भंडारी, गिरीष जाधव, विक्रम राठोड, नगरसेवक योगिराज गाडे यांचा समावेश होता.

### ठेकेदारांच्या प्रलंबित बिलांसाठी पाठपुरावा करा

बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टरर्सच्या प्रलंबित बिलांसदर्भात प्रश्न उपस्थित केला. सहकारी विभागाकडून होणा-या विलंबामुळे अनेक ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले असून काहींवर आत्महत्या करण्याची वेळही आली आहे. या समस्येवर त्वरीत तोउगा काढण्यासाठी पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### औद्योगिक वापराच्या वीजेचे दर कमी हवेत

इंजिनिअर संघटनांच्या वतीने औद्योगिक क्षेत्रातील वीज दर कमी करण्याची मागणी केली. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील व्यवसायिक आणि औद्योगिक वीज वापराचे दर अधिक असल्याने उद्योगधंद्यांना फटका बसत आहे. संपूर्ण देशभर एकसमान वीज दर लागू करण्यासाठी प्रयत्न करण्याचे साकडे यावेळी खा. लंके यांना यावेळी घालण्यात आले.

## परिवर्तनकडून सत्ताधाऱ्यांचा 'कचरा'!

■ माध्यमिक शिक्षक सोसायटीवर परितर्वनचा झेंडा
■ सत्ताधारी पुरोगामी मंडळाला २५ वर्षानंतर धोबीपछाड

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणूकीत सत्ताधारी पुरोगामी मंडळास धोबीपछाड देत परिवर्तन मंडळाने सर्व जागा जिंकत २५ वर्षानंतर सोसायटीवर झेंडा रोवला.**

संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी रविवारी तालुकानिहाय मतदान झाल्यानंतर नगरमध्ये सोमवारी सकाळी मतमोजणीस प्रारंभ झाला. यंदाच्या निवडणूकीमध्ये सत्ताधाऱ्यांविरोधकांनी एकजुट करत तगडे आव्हान उभे केले होते. गेल्या २५ वर्षांपासून प्रा. भाऊसाहेब कचरे यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी सहकार मंडळाची सत्ता होती. यंदाच्या निवडणूकीतही कचरे यांच्या नेतृत्वाखाली पॅनल उतरविण्यात आले होते. मात्र त्यांच्या विरोधकांनी एकत्र येत स्वाभिमानी परितर्वन मंडळ रिंगणात उतरवत प्रचाराच्या पहिल्या दिवसापासून आक्रमक प्रचार यंत्रणा राबविली. याच यंत्रणेच्या जोरावर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांचा कचरा केला.



■ माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या निवडणूकीत विजय संपादन केल्यानंतर परिवर्तन मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

### पारदर्शी कारभाराला चपराक

गेल्या २५ वर्षांपासून हाती सत्ता असलेल्या पुरोगामी सहकार पॅनलने पारदश कारभार केल्याचा दावा करत पुन्हा हाती सत्ता देण्याचे आवाहन केले होते. मात्र विरोधकांनी त्यास साफ नाकारत सत्ताधाऱ्यांना कात्रजचा घाट दाखविला. पारनेर शाखेची जागा खरेदी वादात सापडून उद्घाटन समारंभाच्या कोनशिलेवर प्रा.भाऊसाहेब कचरे यांचे नाव टाकल्यानेही वादंग झाला होता. जागा खरेदी वादग्रस्त असताना पारदर्शक कारभार कसा असा सवाल सभासद या निवडणूकीच्या निमित्ताने करत होते.

### आ. दाते यांच्या भावाला पराभवाचा धक्का

पुरोगामी सहकार मंडळाने आमदार काशिनाथ दाते यांचे बंधू बाबासाहेब दाते यांना उमेदवारी देऊन वजनदार पॅनल तयार करण्याची खेळी केली मात्र ती सपशेल फेल ठरली. बाबासाहेब दाते यांच्यासाठी आ. दाते यांची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत होती. प्रत्येक तालुक्यातही तसेच नियोजन करण्यात आले होते. मात्र पारनेर तालुक्यातच बाबासाहेब दाते हे ६२ मतांनी पिछाडीवर पडले तर जिल्ह्याच्या गुणपत्रामध्ये ते तिसाव्या स्थानावर फेकले गेले.

### परिवर्तनचा विजय सुकर

शिक्षक नेते राजेंद्र लांडे, प्राचार्य सुनील पंडीत तसेच परिवर्तन मंडळाचे अध्यक्ष दत्ता नारळे यांनी सर्व शिक्षक संघटनांना एकत्र करीत सत्ताधाऱ्यांपुढे कडवे आव्हान उभे केले होते. सर्व संघटनांची वज्रमुठ झाल्याने तिसऱ्या आघाडीचा प्रयोग अशस्वी झाला आणि परिवर्तन मंडळाच्या विजयाचा मार्ग सुकर झाला.

### नाराजांनी कचरेंना वाऱ्यावर सोडले

सत्ताधारी पुरोगामी सहकार मंडळाकडे इच्छुकांची संख्या मोठी असल्याने उमेदवारी वाटप करताना प्रा. भाऊसाहेब कचरे यांची मोठी डोकेदुखी झाली. विद्यमान संचालकांना डावलून नव्या उमेदवारांना संधी देण्यात आली. त्यातून विद्यमान तसेच निष्ठावान संचालक नाराज झाले. त्यांनी कचरे यांना वाऱ्यावर सोडून देत विरोधी मंडळाच्या प्रचारात सक्रीय सहभाग घेतला. त्यात सुरेश मिसाळ, कल्याण ठोंबरे यांच्यासह एकूण सात माजी संचालक आघाडीवर होते.

### पराभूत उमेदवार व त्यांना मिळालेली मते

सर्वसाधारण प्रवर्ग : केरू आभाळे ३ हजार ६७४, अशोक आळेकर ३ हजार ५५३, वाल्मीक काकडे ३ हजार ५१९, भास्कर कानवडे ३ हजार ७२१, आशिष काळदाते ३ हजार ५१२, अशोक काळे ३ हजार ६२९, सोपान काळे ३ हजार ६८३, संजय चेमटे ३ हजार ४११, कल्याण थिटे ३ हजार ३२५, बाबासाहेब दाते ३ हजार ३१२, अजितराय दिवटे २०७, सचिन फटांगरे ३ हजार ६७०, राहूल बोरूडे ३ हजार ४८७, गणेश म्हस्के ३ हजार ३७२, धनंजय म्हस्के ३ हजार ६६९, शिवनाथ वेताळ ३ हजार ३९, राजेश शिंदे २ हजार ८५४. महिला राखीव : माधुरी एकशिंगे ३ हजार ८८४, सुरेखा ढोकळे ३ हजार ४८३ अनुसुचित जाती, जमाती प्रवर्ग महेंद्र राजगुरू ३ हजार ७७४ इतर मागास प्रवर्ग : संजय वाळे ३ हजार ९५० विमुक्त भटके प्रवर्ग : वैभव सांगळे ३ हजार ४८२

### ४०० मते बाद !

विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांकडूनही तब्बल ३९४ मते बाद झाली. क्रॉस मतदान करण्याच्या नादात ही मते बाद झाली असावीत असे सांगण्यात येते. क्रॉस मतदान होऊनही सत्ताधारी मंडळाचा एकही उमेदवार विजयासमीप पोहचू शकला नाही.

### ते रूसले, त्यांनी ३९ दिवसानंतर चप्पल घातली !

पुरोगामी सहकार मंडळाकडून आपणास उमेदवारी मिळावी यासाठी माजी संचालक ज्ञानेश्वर काळे हे आग्रही होते. मात्र उमेदवारांच्या मोठया संख्येमुळे त्यांना उमेदवारी मिळू शकली नाही. उमेदवारी डावलली गेल्याने ते रूसले आणि सत्ताधाऱ्यांचा पाडाव केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी शपथ घेत त्यांनी चप्पल घालण्याचे सोडून दिले. उमेदवारी जाहिर झाल्यानंतर ३९ दिवसांनंतर सोमवारी निकाल जाहिर झाला. सत्ताधाऱ्यांचे पानीपत झाले. त्यानंतर मात्र काळे हे हसले आणि त्यांनी पायात चप्पल घातली.

### विजयी उमेदवार व त्यांना मिळालेली मते

सर्वसाधारण प्रवर्ग : बाजीराव अनभुले ४ हजार ३००, राजेंद्र कोतकर ४ हजार ६३६, अतुल कोताडे ४ हजार २७५, सुधीर कानवडे ४ हजार ६२९, संभाजी गाडे ४ हजार ६२६, बाळाजी गायकवाड ४ हजार ४९०, उमेश वाळुंज ४ हजार ६३८, अप्पासाहेब जगताप ४ हजार ५०५, सुनील दानवे ४ हजार ७२७, किशोर धुमाळ ४ हजार ५६२, विजय पठारे ४ हजार २४८, छबु फुंदे ४ हजार ३८९, साहेबराव रक्टे ४ हजार ३५२, शिवाजी लवांडे ४ हजार ३११, अप्पासाहेब शिंदे ५ हजार २३०, महेंद्र हिंगे ४ हजार ६३७. महिला राखीव : वर्षा खिलारी ४ हजार ८९२, वैशाली दारकुंडे ४ हजार ८२३. अनुसुचित जाती प्रवर्ग : सुरज घाटविसावे ४ हजार ६२४ इतर मागास प्रवर्ग : अर्जुन वाळके ४ हजार ६३८ भटके विमुक्त प्रवर्ग : बाबासाहेब बोडखे ५ हजार १२०

## रस्त्यांसाठी साडेतीन कोटी रूपयांचा निधी - खा. नीलेश लंके

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील विविध विकास कामांसाठी साडेतीन कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.**



खा. नीलेश लंके यांनी सांगितले की, विधानसभेनंतर लोकसभेमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यानंतर आपला विकास कामांचा सिलसिला सुरूच आहे. नागरिकांच्या मागणीतून आलेल्या रस्त्यांसाठी जिल्हा नियोजन मंडळामार्फत निधी मंजुर करण्यात आला असून या रस्त्यांच्या कामांना लवकरच सुरूवात होईल.

इतर जिल्हा मार्ग १०८ पिंपरीपठार ते पाडळीदर्या या रस्त्यासाठी ७५ लाख, राज्य मार्ग ६० ते भोंद्रे ते कान्हूरपठार इतर जिल्हा मार्ग १९४ मध्ये सुधारणा करण्यासाठी ७५ लाख, लोणीमावळा ते दरोडी ग्रामीण माग ५८ मध्ये सुधारणा करण्यासाठी ५० लाख, सांगवी सुर्या ते वडूले ग्रामीण मार्ग ९५ मध्ये सुधारणा करण्यासाठी ७५ लाख, हंगा ते मुंगशी ते सुलतानपुर ग्रामीण मार्ग ११४ मध्ये सुधारणा करण्यासाठी ७५ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे.

नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन रस्त्यांच्या कामासाठी निधी मंजुर केल्याबददल भोंद्रे, कान्हूरपठार, पिंपरीपठार, पाडळीदर्या, लोणीमावळा, दरोडी, सांगवी सुर्या, वडूले, हंगे, मुंगशे, म्हसणे सुलतानपुर येथील ग्रामस्थांनी खा. नीलेश लंके यांना धन्यवाद दिले आहेत.

## माझं देखील राजकीय पुनर्वसन करा!

डॉ.सुजय विखेंची भर कार्यक्रमात मागणी

अहिल्यानगर : प्रतिनिधी



**लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले अहिल्यानगर येथील भाजपचे माजी खासदार डॉ.सुजय विखे यांनी भाजप आमदारांच्या सत्कार समारंभात आपल्या पुनर्वसनाची मागणी केली.**

नगर शहरात भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्ह्यातील महायुतीतील नवनिर्वाचित आमदारांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सत्कार समारंभासाठी जिल्ह्यातील जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्यासह महायुतीच्या १० पैकी ८ आमदारांनी हजेरी लावली. नगर शहरातील सहकार सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातील महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सत्कार समारंभामध्ये माजी खासदार सुजय विखे यांचा देखील सत्कार करण्यात आला. यानंतर आपल्या भाषणामध्ये बोलताना डॉ.सुजय विखे यांनी आपलं राजकीय पुनर्वसन करावे, अशी विनंती महायुतीच्या आमदारांना केली.

उर्वरीत पान ३ वर

## पाठपुरावा खा.लंकेंचा चढाओढ महायुतीच्या आमदारांची !

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आ. राजळे, आ.लहामटे आग्रही

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी खासदार नीलेश लंके यांनी संसदेत आवाज उठवून त्यासाठी संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरवा केल्यानंतर केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राज्य शासनाने नगर जिल्ह्यातील या महाविद्यालयास जागा पाहण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली. खा. नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यास यश आल्यानंतर हे महाविद्यालय आपल्याच मतदार संघात असावे यासाठी महायुतीचे आमदार मोनिका राजळे व डॉ. किरण लहामटे यांच्यात चढाओढ सुरू झाली आहे.**



### काय म्हणाल्या मोनिका राजळे ?

काल परवापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची बातमी येत आहे. पाथर्डी-शेवगांव परिसरात या महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध झाली तर जसे प्रवरा, संगमनेर भागात वैद्यकिय महाविद्यालयाचे साम्राज्य उभे राहिले तसे आमच्या भागात रहावे अशी आमची भूमिका आहे. लाडक्या बहिणीची मागणी पालकमंत्री मान्य करतील अशी अपेक्षा मोनिका राजळे यांनी व्यक्त केली.

पहिल्याच अधिवेशनात नगर जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसल्याकडे संसदेचे लक्ष वेधले होते. लंके यांच्या या मागणीची दखल घेत उर्वरीत पान ३ वर




# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

## मंगळ लाल का आहे?



**मंगळ हा सौर मंडळातील सूर्यापासून चौथा ग्रह आहे. तो फक्त बुधापेक्षा मोठा आहे. मंगळावर पाणी असल्याचे शास्त्रज्ञांचे मत आहे. हा ग्रह त्याच्या अनोख्या रंगामुळे सुरुवातीपासूनच मानवांसाठी आकर्षणाचा विषय राहिला आहे. त्याच्या गंजलेल्या रंगामुळे त्याला लाल ग्रह असे टोपणनाव देण्यात आले आहे. पण प्रश्न असा पडतो की या ग्रहाला लाल रंग का मिळाला?**

### रंग लाल असण्याचे कारण

सीएनएनच्या वृत्तानुसार, मंगळाचा रंग त्याच्या पृष्ठभागावरील गंजलेल्यासारख्या रंगाच्या धुळीमुळे आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. त्याला फेरीहायड्राइट म्हणतात. ही धूळ मंगळाला लाल रंग देते. मंगळावर पाठवलेल्या अंतराळयान आणि लँडर्सकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे हे उघड झाले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, पृथ्वीवर होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेप्रमाणे, जेव्हा खडकांमध्ये असलेले लोह पाण्यात मिसळते किंवा मंगळाच्या वातावरणात असलेले पाणी आणि ऑक्सिजन मिसळते तेव्हा त्यातून लोह ऑक्साईड तयार होतो.


### फेरीहायड्राइटमुळे मंगळ लाल

मंगळावरील वाऱ्यांनी अब्जावधी वर्षांपासून लोह ऑक्साईड संपूर्ण ग्रहावर पसरवले आणि त्याचे धुळीत रूपांतर केले. यामुळे मंगळाला त्याचा खास लाल रंग मिळाला. मंगळावर आता द्रवरूप पाणी नसल्याने, शास्त्रज्ञांचा पूर्वी असा विश्वास होता की त्याचा गंज-लाल रंग धुळीत असलेल्या हेमॅटाइट सारख्या कोरड्या लोह ऑक्साईडमुळे आहे. तथापि, उपग्रह डेटा आणि प्रयोगशाळेच्या प्रक्रियेच्या नवीन विश्लेषणानुसार, फेरिहायड्राइट हे ग्रहाच्या लाल रंगाचे चांगले स्पष्टीकरण असू शकते.



### शास्त्रज्ञांनी काय म्हटले?

ब्राउन विद्यापीठातील पृथ्वी, पर्यावरण आणि ग्रह विज्ञान विभागातील प्रमुख लेखक ॲडोमास व्हॅलेंटिनास म्हणाले, की मंगळ अजूनही लाल ग्रह आहे. मंगळ लाल का आहे याबद्दलची आपली समज बदलली आहे. मंगळाच्या धुळीचा एक प्रमुख घटक म्हणून फेरिहायड्राइटची ओळख पटल्याने मंगळाच्या भूतकाळाबद्दलच्या आपल्या ज्ञानावर आणि परग्रही जीवनाच्या शक्यतेवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतात. मंगळावर फेरिहायड्राइटचे अस्तित्व दर्शवते की या ग्रहावर मूळतः द्रव पाण्याचे वातावरण होते, जे जीवनासाठी आवश्यक आहे. अभ्यासाचे सह-लेखक जॅक मस्टर्ड म्हणाले की हे संशोधन एक रहस्य उलगडण्याची संधी प्रदान करते. त्यांनी भर दिला की निष्कर्ष उत्साहवर्धक असले तरी, मंगळावरून घेतलेल्या प्रत्यक्ष नमुन्यांवरूनच त्यांची पडताळणी करता येईल. नासाचे पर्सिव्हरन्स रोव्हर नमुने गोळा करत आहे आणि जेव्हा ते पृथ्वीवर परत येईल तेव्हा शास्त्रज्ञ फेरिहायड्राइटची कल्पना बरोबर आहे की नाही याची पुष्टी करू शकतील.



# भूकंप

**मणिपूरमध्ये बुधवारी झालेल्या भूकंपाची तीव्रता ५.७. रिश्टर स्केल इतकी होती. आसाम, मेघालय आणि अरुणाचलच्या काही भागांत भूकंपाचे धक्के जाणवले. वर्षभरात कुठेना कुठे भूकंपाचे सौम्य किंवा तीव्र धक्के जाणवतच असतात. मोठे नुकसान न झाल्याने ती चर्चा त्याचवेळी होऊन पुन्हा विस्मृतीतही जाते. मात्र भूकंपाची पूर्वसूचना देणारी यंत्रणा भारतात आहे का, नसेल तर ती का नाही, त्यादृष्टीने काय हालचाली सुरू आहेत, याबद्दल जाणून घेणे उत्सुकतेचे आहे...**



गेल्या महिन्यात जपानच्या क्युशू बेटावर ६.९ रिश्टर स्केल तीव्रतेचा मोठा भूकंप झाला. हा २०२५ मधील दुसरा मोठा भूकंप होता. त्याआधी भारताच्या शेजारी असणाऱ्या तिबेटमध्ये भूकंपाने १०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला. अलीकडेच इंडोनेशिया, पश्चिम्चि बंगालमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. दिल्लीमध्ये नुकतेच ७ दिवसांत तीन वेळा भूकंपाचे धक्के जाणवले. नैसर्गिक आपत्ती किंवा भूकंपापासून वाचण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सजगता आणि बचावाची सक्षम व्यवस्था. यासंदर्भात अनेक देशांचे दाखले आपल्यापुढे आहेत. जपानचे उदाहरण तर आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. अल्जेरियासारख्या देशातही आता शाळा, निवासी घरकुलांचे बांधकाम सीस्मिक कोडनुसार करण्यात येत आहे. परिणामी भूकंपाच्या काळात हानीची तीव्रता कमी राहण्यास मदत मिळत आहे. आपल्याकडे मात्र एखाद्या भागात भूकंपाचा धक्का बसल्यानंतर त्याबाबत चर्चा सुरू होते. काही दिवस काळजी घेतली जाते आणि खबरदारी म्हणून सजगताही पाळली जाते. कालांतराने 'जैसे थे' होते. काही दिवसांपूर्वी राजधानी दिल्लीत भूकंपाचा जोरदार धक्का बसला. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता चारच्या आसपास होती. हा भूकंप काही अचानक झालेला नाही. त्याची पूर्वसूचना तिबेटच्या भूकंपाने दिली होती. परंतु आपण गाफील राहिलो.



### भूकंप कधीही...

हिमालय आणि संलग्न भागात भूकंपाचा धक्का हा आता एकप्रकारे इशारा मानायला हवा. पण भूकंपाच्या सतत बातम्या येणे या गोष्टी चिंतेत भर घालणाऱ्या आहेत. पर्वतीय राज्यांत प्रामुख्याने उत्तराखंडपासून ते देशाची राजधानी दिल्ली एनसीआरदरम्यान सध्या भूगर्भातील स्थिती चिंताजनक आहे आणि कोणत्याही क्षणी या भागात शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसू शकतो, असे इशारे दिले जात आहेत. डेहराडून येथील 'वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजी'च्या शास्त्रज्ञांच्या इशाऱ्यानुसार हिमालय परिसरात महातीव्रतेचा भूकंप कधीही येऊ शकतो. म्हणून मनुष्यहानी आणि वित्तहानी मर्यादित ठेवण्यासाठी आतापासूनच तयारी करणे आवश्यक आहे. आयआयटी कानपूरच्या पृथ्वी विज्ञान विभागाच्या प्राध्यापकांच्या मते, पृथ्वीच्या भूगर्भात असणाऱ्या भारतीय प्लेट आणि युरेशियन प्लेट यांच्यात घर्षण सुरू आहे. परिणामी तेथे ऊर्जा निर्माण झाली आहे आणि ती कधीही मोठ्या स्फोटासह बाहेर पडू शकते. ही बाब विनाशकारी भूकंपाला कारणीभूत ठरू शकते. वाडिया इन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञानुसार, हिंदूकुश पर्वतापासून ईशान्य भारतापर्यंत हिमालयाचा भाग हा भूकंपप्रवण आणि संवेदनशील आहे. मात्र या धोक्याचा मुकाबला करण्यासाठी संबंधित राज्यांत परिणामकारक धोरणांचा अंमल दिसत नाही.

### आगाऊ सूचना प्रणाली

पृथ्वीच्या पोटात सुरू असलेल्या घडामोडींमुळे ज्वालामुखी फुटण्यापासून भूकंपापर्यंतचा धोका कायम राहिला आहे. परिणामी पृथ्वीवर भूकंपाचे धक्के दरवर्षी जाणवतात. यात हानिकारक भूकंपाची संख्या खूपच कमी आहे. मोठ्या भूकंपाची अशी ठराविक तारीख, वेळ निश्चित नसल्याचे शास्त्रज्ञ अनेक दशकांपासून सांगत आले आहेत. पण आतापर्यंत भूकंपाची आगाऊ सूचना देणारी प्रणाली का विकसित होऊ शकली नाही असा प्रश्न उपस्थित होतो. शास्त्रज्ञांनी या क्षेत्रात चांगले योगदान देऊनही मनुष्यप्राणी आजही पृथ्वीच्या उदरात चाललेल्या घडामोडीचे आकलन करण्यास अक्षम ठरला आहे.

- **तूर्त कोणत्या क्षणी आणि कोठे किती तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसेल, हे आताच सांगता येत नाही. प्रत्यक्षात भूगर्भातील प्लेट हे एकमेकांना जोडल्याने आणि वेगळे होणे तसेच ताटातूट होत असल्याने जमिनीत दबाव, रासायनिक क्रिया या कारणांमुळे निर्माण होणाऱ्या ऊर्जा लहरी यांची गोळाबेरीज केली असता त्याचे विकृत रूप भूकंपाच्या माध्यमातून वेळोवेळी पाहावयास मिळाले आहे. अर्थात भूकंपापासून आपण काही धडे शिकलो तर या नैसर्गिक संकटापासून काही प्रमाणात स्वतःचा बचाव करू शकू.**



### उत्तराखंडचा प्रयोग फसला...

चार वर्षांपूर्वी भूकंपाबाबत सजगता आणण्यासाठी उत्तराखंडमध्ये पुढाकार घेतला गेला. २०२१ मध्ये आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि आयआयटी रुरकीने एकत्र येत उत्तराखंड भूकंप अॅलर्ट अॅप तयार केला. यानुसार भूकंपाची पूर्वसूचना देणारा अॅप लागू करणारे उत्तराखंड पहिले राज्य ठरल्याचा दावाही करण्यात आला. शिवाय ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, त्यांच्याही फोनवर भूकंपाची पूर्वसूचना मिळेल, असेही सांगण्यात आले. या अॅपमुळे लोकांना वेळीच यापासून बचाव करता येणे शक्य होईल, असे वाटू लागले. गेल्या दहा-पंधरा वर्षांत उत्तराखंडला भूकंपाचे ७०० हून अधिक धक्के बसले. या पार्श्वभूमीवर या 'अॅप'ला एक वरदान म्हणून पाहिले जाऊ लागले. परंतु प्रत्यक्षात या अॅपचा उत्तराखंडच्या नागरिकांना काहीच फायदा झाला नाही. हिमालय भागातील भौगोलिक स्थितीचे आकलन केले तर तेथे भूगर्भातील हालचालींमुळे भूकंप येण्याचा धोका हा नेहमीच राहतो. तरीही भारत भूकंपाची पूर्वसूचना देणारी एकही विश्वसनीय प्रणाली विकसित करू शकला नाही. इतकेच नव्हे तर जगभरात अशा प्रकारची कोणतीच प्रणाली अस्तित्वात नसल्याचे सरकारने सांगून टाकले आहे. त्यामुळे कोणताही देश, संघटना किंवा शास्त्रज्ञ भूकंप, ज्वालामुखी आणि त्सुनामीसारख्या नैसर्गिक संकटाची पूर्वसूचना देऊ असे ठाम सांगू शकले नाही.



### इटलीत काय घडलं होतं?

एक घटना इटलीतील भूकंपाच्या पूर्वसूचनेशी संबंधित असून या घटनेने जगभरातील शास्त्रज्ञांच्या गटाला अस्वस्थ केले. प्रत्यक्षात दीड दशकापूर्वी २०११ मध्ये सहा शास्त्रज्ञ आणि एक सरकारी अधिकाऱ्यांविरोधात हत्येचा खटला दाखल करण्यात आला. कारण ते ६ एप्रिल २००९ मध्ये इटलीतील ला अकिला येथील भूकंपाचे योग्य भाकित करू शकले नाहीत किंवा करण्यास अपयशी ठरले. ही मंडळी इटलीतील नैसर्गिक आपत्तीच्या संभाव्य धोक्यावर देखरेख करणाऱ्या समितीचे सदस्य होते. त्यांना ला अकिला येथील भूकंपाच्या एक दिवस अगोदर पाचारण करण्यात आले होते आणि येत्या काही दिवसांत भूकंप तर होणार नाही ना, अशी विचारणा केली गेली होती. त्यांना बोलाविण्याचे कारण म्हणजे संबंधित संवेदनशील भागात रेडॉन वायू बाहेर पडत होता. पण शास्त्रज्ञांनी संबंधित भाग रिकामा केला जावा अशी कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगितले. परंतु दुसऱ्या दिवशी ६.३ रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला आणि त्यात ३०० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला. जगभरातील हजारो शास्त्रज्ञांनी सामुदायिक निवेदन देत या खटल्याला विरोध केला. त्यांच्या मते, शास्त्रज्ञांना बळीचा बकरा करू नये आणि त्याऐवजी सुरक्षेच्या उपायांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कारण भूकंपाविषयीची अचूक भविष्यवाणी करणारी कोणतीही प्रणाली अद्याप विकसित झालेली नाही. रेडॉन गॅसचा मुद्दा पाहिला तर ती भूकंपाचे भाकित करणारी एक वादग्रस्त प्रणाली असून अनेकदा फोलही ठरली आहे.




## वोटर आयडीवरील फोटो बदला घरबसल्या

जर कोणत्याही भारतीय नागरिकाचे वय १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असेल तर त्याच्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या यादीत मतदार ओळखपत्र समाविष्ट केले जाते. मतदार ओळखपत्र बनवल्यानंतर त्यांचा फोटो पाहून बहुतेक लोक निराश होतात. ते म्हणतात की फोटो चांगला आला नाही. पूर्वी, मतदार ओळखपत्रात कोणताही बदल करण्यासाठी, सरकारी कार्यालयात जावे लागत असे. काळ बदलला तसतसे मी सीएसई सेंटरमध्ये हे काम आले. आता हे काम अधिक सोपे झाले आहे. मतदार ओळखपत्रातील कोणतीही दुरुस्ती, जरी ती फोटो बदलण्याशी संबंधित असली तरी, आता घरबसल्या करता येईल. निवडणूक आयोगाच्या एकाच अॅपद्वारे लोकांच्या सर्व समस्या सोडवल्या जात आहेत. हे अॅप वापरण्यास खूप सोपे आहे. ते तुमचा वेळ वाचवेलच पण घराबाहेर पडून जवळच्या सरकारी केंद्रात जाण्याची गरजही कमी करेल.

### फोटो कसा बदलायचा?

- सर्वप्रथम मतदार हेल्पलाइन अॅप डाउनलोड करा.
- अॅपची लॉगिन प्रक्रिया फॉलो करा.
- नोंदणीकृत मोबाईल नंबरच्या मदतीने लॉग इन करा.
- तुमच्या फोन नंबरवर ओटीपी येईल, तो एंटर करा.
- मतदार नोंदणी पर्यायावर जा आणि नोंदींमध्ये सुधारणा निवडा.
- येथे तुम्हाला विचारले जाईल की तुमच्याकडे मतदार ओळखपत्र क्रमांक आहे की नाही.
- जर नसेल तर तुम्हाला फॉर्म ८ भरावा लागेल. ते खूप काळजीपूर्वक भरावे लागते.
- शेवटी तुमचा आधार क्रमांक टाइप करा आणि नोंदींमध्ये सुधारणा विभागात जा.
- सर्व तपशील काळजीपूर्वक भरा आणि दिलेल्या पर्यायांचे अनुसरण करा.
- शेवटी, तुमचे सर्व तपशील काळजीपूर्वक तपासा आणि ते बरोबर असल्यास सबमिट करा.



### बदल ऑफलाइन देखील करा...

तुम्ही तुमचे मतदार ओळखपत्र ऑफलाइन देखील दुरुस्त करू शकता. यासाठी तुम्हाला नोंदणी कार्यालयात जावे लागेल. येथे गेल्यानंतर, तुम्हाला दुरुस्ती फॉर्म घ्यावा लागेल. तुम्हाला त्या फॉर्मवरील सर्व तपशील प्रविष्ट करावे लागतील. तसेच फॉर्म फक्त कार्यालयातच जमा केला जाईल. तथापि, ही प्रक्रिया थोडी लांब आहे आणि वापरकर्त्यांसाठी निराशाजनक असू शकते. त्यामुळे, ऑनलाइन प्रक्रिया फॉलो करणे तुमच्यासाठी सोपे होऊ शकते. ऑनलाइन प्रक्रियेत अर्ज लवकर प्रक्रिया होतात असे म्हटले जाते.

## तुर्की की भारत, लोहयुग कुठून सुरू झाले?



**तुर्की हा जगातील पहिला प्रदेश आहे ज्याने लोखंडाचे उत्पादन सुरू केले असे फार पूर्वीपासून मानले जाते. परंतु अलिकडच्या एका शोधामुळे लोहयुगाच्या सुरुवातीबद्दल एक नवीन वाद निर्माण झाला आहे. पुरातत्वशास्त्रज्ञांना भारतातील तामिळनाडूमधील सहा ठिकाणी २९५३-३३४५ ईसापूर्व काळातील लोखंडी वस्तू सापडल्या आहेत. अलीकडील एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की दक्षिणेकडील राज्य हे लोखंड वितळवणारे आणि वापरणारे जगातील पहिले ठिकाण होते.**

- सुरुवातीचे लोखंड कुठून आले? : सुरुवातीला जेव्हा मानवांनी लोखंडाचा वापर सुरू केला तेव्हा ते दोन प्रकारचे होते. एक उल्कापिंडापासून बनलेले होते आणि दुसरे वितळवलेले होते. वितळवलेले लोखंड धातूंमधून काढले जात असे. मोठ्या प्रमाणात उत्पादनामुळे ते लोखंडाची सुरुवात म्हणून ओळखले जाऊ लागले. उल्कापिंडवाले लोखंड हे पृथ्वीवर पडणाऱ्या उल्कापिंडांपासून मिळत होते.
- वितळवून करत होते लोखंडाचा वापर : तामिळनाडूच्या राज्य पुरातत्व विभागाच्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना ५३०० वर्षांपूर्वीपासूनच लोखंड वितळवण्याची कला माहित होती आणि ती वापरली जात होती. यासाठी १२०० ते १४०० अंश तापमान आवश्यक आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, लोखंड काढणे, वितळवणे आणि आकार देण्याची प्रक्रिया भारतीय उपखंडात सुरू झाली असावी, असे ताज्या शोधातून सूचित होते.



- लोहयुगाचा पुरावा : पुरातत्वशास्त्रज्ञांनी तामिळनाडूमधील आदिच्चनल्लूर, शिवगलाई, मयिलाडुमपराई, किलनामंडी, मंगडू आणि थेलुंगनूर या ठिकाणांहून नमुने गोळा केले. शिवगलाई येथे सापडलेला कोळसा आणि भांड्यांचे तुकडे (सिरेमिक मटेरियलचे) २९५३ ते ३३४५ ईसापूर्व काळातील आहेत. यामुळे जगभरात लोखंड तंत्रज्ञानाचा हा पहिला ज्ञात वापर बनतो. पुरातत्वशास्त्रज्ञांना वेगवेगळ्या ठिकाणांहून लोखंडी कुदळी, भाले, बाणांचे टोक, छिन्नी, कुऱ्हाडी आणि तलवारी देखील सापडल्या आहेत. लोहयुगाची सुरुवात अनातोलियाच्या हित्ती साम्राज्यात झाली असे मानले जाते, जिथे कदाचित इ.स.पूर्व १३०० च्या सुमारास लोह तंत्रज्ञानाचा उदय झाला असावा. पण तामिळनाडूतील शोध ते चुकीचे सिद्ध करतात. याचा अर्थ असा की लोहयुग पूर्वी मानल्या जाणाऱ्यापेक्षा सुमारे हजार वर्षे आधी सुरू झाला असावे. पुरातत्वशास्त्रज्ञांना हे समजण्यासाठी वेळ लागेल.

## शॉर्ट न्यूज

### १३ एप्रिलला नगरला महाजनआक्रोश मोर्चा

■ **नगर :** मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या व सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी जनतेने दबाव निर्माण करावा. तरच या प्रकरणी या कुटुंबियांना न्याय मिळेल, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी केले. मराठा समाजाच्या बैठकीत ते बोलत होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळण्यासाठी अहिल्यानगर येथे १३ एप्रिलला सर्व जातीधर्मिय, सर्वपक्षीय महा जनआक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. त्याच्या नियोजनासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

### विखेंच्या कारखान्याची होणार चौकशी

■ **राहाता :** तब्बल नऊ कोटी बोगस कर्ज प्रकरणी अहिल्यानगर जिल्ह्यातील एका मोठ्या साखर कारखान्याला सर्वोच्च न्यायालयाने दणका दिला आहे. या बोगस कर्ज प्रकरणी राहता न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. कारखाना बोगस कर्ज प्रकरणी याचिकाकर्ते बाळासाहेब विखे पाटील व दादासाहेब पवार यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होऊन सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत.

### नेवासा येथे पोलिसांचे संचलन

■ **नेवासा :** आगामी रामनवमी, ईद व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती बंदोबस्त शांततेत, सुव्यवस्थेत होण्यासाठी नेवासा शहर, कुकाणा, नेवासा फाटा या ठिकाणी रॅपिड ॲक्शन फोर्स (शीघ्र कृती दल) व जिल्हा पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी पथसंचलन करण्यात आले.पथसंचलनासाठी नेवासा पोलिस ठाण्याचे निरीक्षक धनंजय जाधव यांच्यासह पोलिस ठाण्याचे सह अधिकारी व २६ पोलिस अंमलदार, रॅपिड ॲक्शन फोर्सचे १०२ बटालियन, द्रुत कार्य बल (आरएएफ) च्या सहायक कमांडंट प्रियंकासिंह परिहार, निरीक्षक दत्तात्रय तसेच ३४ पोलिस कर्मचारी सहभागी झाले.

### बारा गावांचे टँकरसाठी प्रस्ताव

■ **पाथर्डी :** तालुक्यातील टंचाईची परिस्थिती गंभीर झालेली आहे. बारा गावातील ग्रामपंचायतींनी टँकर मिळावा यासाठी प्रस्ताव पंचायत समितीकडे दाखल केले आहेत. यापैकी तीन गावांचे प्रस्ताव जलदुत प्रणालीत ऑनलाइन करण्यात आलेले आहेत. ऑनलाइन प्रक्रियेमुळे टँकर मंजुरीला उशीर होत आहे. पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे यावर्षी टंचाईची भिषणता अधिक वाढली आहे. अधिकाऱ्यांनी नियम सांगावेत पण जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. जनभावना व नियम यांचा मेळ घालून पिण्याचे पाणी तातडीने द्यावे अशी मागणी विविध गावातील सरपंच व गावपुढारी यांनी केली आहे.

### वांबोरीत कांदा १७०० रुपये

■ **वांबोरी :** उपबाजारात झालेल्या कांदा लिलावात २ हजार ५९ कांदा गोण्याची आवक झाली. एक नंबरचा कांदा १ हजार ३०५ रुपये ते १ हजार ७०० रुपये, दोन नंबरचा कांदा ९०५ रुपये ते १ हजार ३०० रुपये तर तीन नंबरचा कांदा २०० रुपये ते ९०० रुपये भावाने विकला गेला. तसेच गोल्टी कांद्याला ८०० रुपये ते १२०० रुपये भाव मिळाला. भुसार मालात गहु २ हजार ५२५ रुपये ते २ हजार ६०० रुपये, तुर ६००० रुपये ते ७००० रुपये तर हरभरा ४ हजार ८०० रुपये याप्रमाणे भाव मिळाले.

# आमदार कर्डिले, राजळेंना मंत्री व्हायचेय!

**माजी खा. विखे यांची पुनर्वसनाची मागणी | सत्कार सोहळ्यात राजकीय टोलेबाजी**



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत विजयी झालेल्या महायुतीच्या आमदारांच्या सत्कार सोहळ्यात राजकीय टोलेबाजी रंगली. त्यात आमदार शिवाजी कर्डिलेंसह मोनिका राजळे यांनी मंत्रिपदाची इच्छा व्यक्त केली. सर्व आमदारांमध्ये मी एकटीच लाडकी बहीण असल्याचा दावा राजळे यांनी केला. तर, माजी खासदार सुजय विखे यांनी मी एकटाच माजी राहिलोय, माझ्या पुनर्वसनाचा विचार करा, अशी मागणी सभापती राम शिंदे व कर्डिले यांना उद्देशून केली. सभापती शिंदे यांनी त्यांना राज्यसभेसाठी शुभेच्छा दिल्या, तर कर्डिले यांनी वर्षभरात तुम्हाला राज्यसभेवर खासदार करू,अशी घोषणा केली.**

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत १२ पैकी महायुतीचे १०आमदार विजयी झाले. त्यांचा सत्कार जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा आमदार शिवाजी कर्डिले यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. यावेळी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे,पालकमंत्री राधाकृष्ण विखे,आमदार मोनिका राजळे, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथदाते, आमदार विठ्ठलराव लंघे,आमदार अमोल खताळ, आमदार विक्रम पाचपुते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच पदाधिकारी, नेत्यांच्या भाषणात टोलेबाजी सुरू झाली. आमदार संग्राम जगताप कार्यक्रमास काहीसे उशिरा आले. यावर त्यांचे मेहुणे अक्षय कर्डिले यांनी जावई असल्यामुळे बोलता येत नाही, अशी टिप्पणी केली. त्याला उत्तर देताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, जावई असलो तरी पाच महिन्यांत प्रथमच माझा सासऱ्यांकडून सत्कार होत आहे. आमदार राजळे यांनीही यावर टिपण्णी केली. जावई शेजारीच असल्याने असे होते.जावई लांब जिल्ह्याबाहेर इतर कुठे असता तर त्याचे स्वागत चांगल्या पद्धतीने झाले असते, असे त्या म्हणाल्या. कर्डिलेयांनी अमोल खताळ यांचा उल्लेख जायंट किलर असाकेला. खताळ म्हणाले, मी प्रथमच आमदार झाल्याने सर्वात छोटा लाडका भाऊ म्हणून आमचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार्य करावे.

# पिंजऱ्यातून निसटलेला बिबट्या पुन्हा जेरबंद

**चार ते पाच बिबट्यांचा मुक्त संचार**



**राहुरी : प्रतिनिधी**

**कुरणवाडी शिवारामध्ये पिंजऱ्यातून निसटलेला बिबट्या पुन्हा पिंजऱ्यात अडकला आहे. शनिवारी (ता.२२) पहाटेच्या दरम्यान वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यामध्ये हा बिबट्या पुन्हा अडकला.**

कुरणवाडीमधे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात गुरुवारी (ता.२०) पहाटे बिबट्या अडकला होता. मात्र, पिंजऱ्या बाहेरील तीन बिबट्यांनी पिंजऱ्याला धडका देत आतमध्ये जेरबंद झालेल्या बिबट्याला सोडवले होते. त्यानंतर या परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी घबराट पसरली होती.

कारण या परिसरामध्ये गेल्या काही दिवसांपासून चार ते पाच बिबट्यांचा मुक्त संचार आहे. या ठिकाणी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी देखील धाव घेतली होती आणि वन विभागाला बिबटे पकडण्यासाठी उपाय योजना कराव्यात, अशी मागणी केली होती. त्यानंतर वन विभागाने या परिसरामध्ये दोन पिंजरे लावले होते. त्यातील एका पिंजऱ्यामध्ये, पिंजऱ्यातूनच निसटलेलाच बिबट्या पुन्हा पिंजऱ्यात अडकला. हा बिबट्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतला आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# पावा आणि बासरी



गीतंवाद्यंनृत्यं संगीतमुच्यते (गीत, वाद्य आणि नृत्य या तिन्हींचा मेळ म्हणजे संगीत होय) असे पंडित शारंगधर यांनी आपल्या संगीतरत्नाकर या ग्रंथात म्हटले आहे.

यात वाद्य या संगीताच्या अंगाचेही पुनः चार प्रकार होतात :-

१) तंतू वाद्ये (सतार, तंबोरा)

२) सुषिर वाद्ये (फुंकून वाजवायची वाद्ये - पावा, बासरी)

3) अनवध्द वाद्ये (चामड्याने मढविलेली वाद्ये - ढोलक, तबला) आणि

४) घन वाद्ये (धातूपासून बनविलेली वाद्ये - टाळ, झांज).

यात सुषिर किंवा फुंकून वाजवायच्या वाद्यांची पावा आणि बासरी अशी दोन उदाहरणे दिलेली आहेत.

साधारणतः पावा आणि बासरी ही फुंकून वाजवायची वाद्ये एकाच अर्थाने वापरली जातात. पावा आणि बासरी ही दोन्हीही वाद्ये बांबूपासून बनवलेली असली तरी वस्तुतः त्यांच्यात फरक आहे.

पावा आपल्या ओठांमध्ये सरळ धरून वाजवायचा असतो. बासरी मात्र ओठांमध्ये आडवी धरून वाजवितात. बासरी म्हणजे कृष्णाचे आवडते वाद्य. बासरीवादन किंवा मुरलीवादन करताना कृष्णाचे रूप मोठे मोहक दिसते. म्हणूनच त्याला बंसीधर, मुरलीधर, मुरली मनोहर अशी सुंदर नावे मिळाली आहेत. कृष्णाच्या बासरी वादनाने समस्त गोकुळ वेडे झाले होते! राधा कृष्णाच्या बासरीचा मत्सर करीत असे. ती कृष्णाच्या बासरीला आपली सवत म्हणत असे. असा उल्लेख संत सूरदास करतात. कृष्णावरती रचल्या गेलेल्या गवळणींमध्ये बासरी, वेणू, मुरली, पावा अशा नावांचा उल्लेख होतो.

नको वाजवू पावा
वेड राधेच्या जीवा
कान्हा रे तुझी वाट पाहे राधिका
नको वाजवू श्रीहरी मुरली
तुझ्या मुलीने तहानभूक हरली रे

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# कात्रज ते सिंहगड ट्रेकचा थरारक अनुभव



निसर्गाच्या सान्निध्यात फिरण्याची आवड असलेल्या प्रत्येक ट्रेकर्ससाठी कात्रज ते सिंहगड ट्रेक हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. या ट्रेकमध्ये खडतर डोंगररांगा पार करत सिंहगड किल्ल्यावर पोहोचण्याचा आनंद वेगळाच असतो. माधव बेडेकर, दीपक आढाव, सुनील मापारी सर, पंकज तिकोणे आणि मी अशा मित्रांनी मिळून हा थरारक ट्रेक पूर्ण केला.

■ **शुभ्र चंद्रप्रकाशात ट्रेकची सुरुवात**

आम्ही पौर्णिमेच्या रात्री १० वाजता हा ट्रेक सुरु करण्याचा निर्णय घेतला. पौर्णिमेचा चंद्र आकाशात झळकत होता आणि त्याच्या शीतल प्रकाशात डोंगररांगा अद्भुत दिसत होत्या. ट्रेकची सुरुवात कात्रजच्या जुन्या बोगद्याजवळून झाली. सुरुवातीलाच डोंगराचा मोठा चढ चढताना दमछाक झाली, पण निसर्गाच्या सान्निध्यात ती थकवणारी वाट न वाटता आनंददायी वाटली. माधव बेडेकर, दीपक आढाव आणि सुनील मापारी सर यांनी हा ट्रेक जवळपास ३० पेक्षा अधिक वेळा पूर्ण केला होता, तर पंकज आणि माझा पहिलाच होता. त्यामुळे त्यांचा अनुभव आम्हां दोघांसाठी या ट्रेक दरम्यान मार्गदर्शक ठरला.

■ **खडतर वाटा आणि निसर्गाची जादू**

कात्रज ते सिंहगड ट्रेकमध्ये जवळपास १६ ते १७ डोंगर पार करावे लागतात. या ट्रेकमध्ये काही कठीण टप्पे आहेत, जे पार करताना तग धरावा लागतो. कधी सरळसोट चढ, तर कधी उतारावरून तोल सांभाळत चालण्याचा प्रयत्न करावा लागतो. या सगळ्यात आमच्या टीमवर्कचा कस लागत होता. मधूनच थांबून पुण्याच्या दिशेने पाहिले, की शहरातील दिव्यांच्या उजेडाने अवकाश सजलेले दिसायचे, जणू काही पृथ्वीवरची आकाशगंगा झगमगत असावी.

■ **सिंहगडाची ओढ आणि यशस्वी ट्रेक**

रात्रीच्या शांततेत फक्त आमचे श्वास आणि पावलांचे आवाज ऐकू येत होते. शेवटचा चढ पार करताना सगळ्यांचीच ताकद संपत आली होती, पण सिंहगडावर पोहोचण्याची आस आम्हाला पुढे नेत होती. अखेर पहाटे ६.३० वाजताच्या सुमारास आम्ही सिंहगडावर पोहोचलो आणि तिथे उगवत्या सुर्याची पहिली किरणं पाहून आमचा सारा थकवा दूर झाला.


■ **या ट्रेकचा अनमोल आनंद**

हा ट्रेक केवळ शारीरिक कसोटी नव्हता, तर निसर्गाच्या सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटण्याचा अनुभव होता. कठीण वाटा पार केल्यानंतर मिळणारे यश, आपली सहनशक्ती ओळखण्याची संधी, आणि मित्रांसोबत घालवलेले क्षण या सगळ्यांनी हा ट्रेक अविस्मरणीय बनवला. कात्रज ते सिंहगड हा ट्रेक सर्वांनी एकदा तरी अनुभवावा. तो केवळ ट्रेक नाही, तर निसर्गासोबत स्वतःचे आणि आपल्या मित्रांबरोबर नवे नाती जोडण्याचा एक अनोखा प्रवास आहे!

■ **एकनाथ भालेकर**

# नीतेश राणेंना जेजुरी ग्रामस्थांचा झटका

**■ मल्हार सर्टिफिकेटचे नाव बदलण्याची मागणी**
**■ जेजुरी मंदिराच्या विश्वस्तांना गावबंदीचा इशारा**



**पुणे : प्रतिनिधी**

**मल्हार सर्टिफिकेटला जेजुरीमधील ग्रामस्थांनी विरोध केला आहे. नीतेश राणे यांना हा मोठा झटका मानला जात आहे. मल्हार सर्टिफिकेशनचे नाव तत्काळ बदलावे, अशी मागणी जेजुरी ग्रामस्थांनी केली आहे. नीतेश राणे यांच्या निर्णयाला पाठिंबा देणाऱ्यांनी भूमिका बदलावी, अन्यथा त्यांना गाव बंदी करू, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.**

ग्रामस्थांना विश्वासात न घेता जेजुरी मंदिराच्या पाच विश्वस्तांनी मुंबई येथे जाऊन नीतेश राणेंचा खंडोबा पगडी घालत सन्मान केला होता. त्यामुळे ग्रामस्थांनी जेजुरी मंदिराच्या पाच विश्वस्तांना गाव बंदीचा इशारा दिला आहे.

राज्यातील राजकारणात हलाल आणि झटक्याच्या मांसाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. मंत्री नीतेश राणे यांनी चिकन आणि मटण खरेदी करणाऱ्यांसाठी मल्हार सर्टिफिकेशन नावाचा एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. हिंदूंनी फक्त हिंदू दुकानातूनच मांस खरेदी करण्याचे आवाहन नीतेश राणे यांनी केले आहे. हिंदू दुकानांमधून मांस खरेदी केल्यास भेसळ होणार नाही, असा दावा त्यांनी केला. मात्र, मल्हार या नावाला जेजुरी ग्रामस्थांनी कडाडून विरोध दर्शवला आहे. तसेच नीतेश राणेंचा सत्कार करणाऱ्या जेजुरी देवस्थानच्या विश्वस्तांना गाव बंदीचा इशारा दिला आहे.

काय म्हणाले जेजुरीचे ग्रामस्थ?

मल्ल नावाच्या दैत्याचा संहार केल्यामुळे खंडोबाचे मल्हार हे नाव आहे. या नावाचा अपभ्रंश होता कामा नये. सर्टिफिकेट योजनेला मल्हार हे नाव देता कामा नये, अशी आमची शासनाला विनंती आहे. आज कुणी मटण खायला बसले, तर तो म्हणणार मला मल्हार आण रे... हे कितपत योग्य आहे? असे भविष्यात कुठेही होता कामा नये. आमची मागणी मान्य झाली नाही, तर आम्ही विश्वस्तांना गावबंदी करू, असा इशारा जेजुरीच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

मल्हार प्रमाणपत्र काय आहे?

मत्सोद्योग मंत्री नीतेश राणे यांनी मल्हार सर्टिफिकेशन नावाचा नवीन उपक्रम सुरू केला आहे. मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉम सुरू झाले. या उपक्रमांतर्गत, राज्यातील सर्व झटका मटण दुकाने मल्हार प्रमाणपत्र या नावाने नोंदणीकृत केली जातील. नोंदणी केल्यानंतर त्यांना मल्हार प्रमाणपत्र मिळेल. याअंतर्गत फक्त हिंदूच चिकन आणि मटणाची दुकाने चालवतील. हिंदू व्यापारी . नावाच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे नोंदणी करू शकतील आणि प्रमाणपत्रे मिळवू शकतील. या प्रमाणपत्रामुळे लोकांना शुद्ध आणि भेसळमुक्त झटक्याचे मांस मिळेल, असा दावा नीतेश राणे यांनी केला आहे.

हिंदूंनी फक्त मल्हार प्रमाणित दुकानांमधून मांस खरेदी करण्याचे आवाहन नीतेश राणे यांनी केले आहे, यामुळे हिंदू तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल, असा युक्तिवाद त्यांनी केला आहे. यामुळे मांस व्यापारात हिंदू समुदायाचेही पुरेसे प्रतिनिधित्व होईल, असेही नीतेश राणे म्हणाले.

(पान १ वरून)

## पाठपुरावा खा.लंकेंचा चढाओढ महायुतीच्या आमदारांची !

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार महाविद्यालयासाठी जागा निश्चित करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती गठीत झाल्यानंतर खा. लंके यांच्या पाठपुराव्यास यश आल्याचे मानले जात असतानाच आता हे महाविद्यालय आपल्याच मतदारसंघात असावे अशी चढाओढ सुरू झाली आहे. यासंदर्भात अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या महाविद्यालयासाठी साकडे घातले आहे तर मोनिका राजळे यांनी भाजपाच्या सत्कार समारंभात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे पाथर्डी-शेवगांव येथे हे महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात साकडे घातले.

## माझं देखील राजकीय पुनर्वसन करा!

यावर कार्यक्रमात मोठा हशा पिकला. डॉ.सुजय विखे यांच्या विनंतीला प्रतिसाद देत सर्व आमदारांनी जिल्ह्यातील महायुतीच्या यशामध्ये विखेंचा सहभाग मोठा असल्याने तुमचं पुनर्वसन निश्चित होईल, असे आश्वासन दिले.

डॉ.सुजय विखे पाटील काय म्हणाले?

''आता व्यासपीठावरील सगळ्यांना पाहिल्यानंतर आता एकच जण माजी राहिला आहे. तो म्हणजे मी. एक काळ होता जेव्हा मी आजी होतो आणि दुर्दैवाने अनेक जण माजी होते. तुम्हाला तरी गप्पा मारायला चार-पाच लोकं होतं. मी एकटा माजी कोणाकडे जायचं? हा माझ्यापुढे प्रश्न आहे. माझी विनंती आहे की, सर्वांनी मिळून माझ्या पुनर्वसनाचा विचार करा. नाहीतर मी फक्त भाषणापुरता आहे. एवढं मोठं शिष्टमंडळ आहे. राम शिंदेंनी पुढाकार घ्यावा. सगळ्या आमदारांनी हातभार लावला तर माझ्या पदरात काहीतरी पडेल. कारण आम्हाला अजून तीन-चार वर्षे अवकाश आहे. चार वर्षात लोकं विसरुन जायला बसलेत. त्यामुळे विचार व्हावा'', असे डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले.

दरम्यान, सुजय विखे पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी लढवली होती. डॉ.सुजय विखे त्यावेळी या मतदारसंघाचे तत्कालीन खासदार होते. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांनी टफ फाईट देत विजय खेचून आणला होता. डॉ.सुजय विखेंना हा पराभव जिव्हारी लागला होता. या पराभवानंतर त्यांचे अद्याप राजकीय पुनर्वसन झालेले नाही.

# पारनेरात कडाडणार डफ, ढोलकी आणि हलगी!

## किसनबाबा चौरेंच्या पुण्यतिथीनिमित्त भक्तीचा मळा फुलणार

**पारनेर : प्रतिनिधी**




**श्री सत्य अविनाश पारखपद समाजाच्या वतीने दरवषप्रमाणे यंदाही आत्मज्ञानी गणपतबाबा चौरे यांचे नातू, सदगुरू ब्रम्हनिष्ठ हरिदास महाराज चौरे यांचे चिरंजीव किसनबाबा चौरे यांच्या २१ व्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने पारनेर शहरात महाराष्ट्रातील नामवंत शाहीरांची शाहीरी तसेच तुणतूण्याबरोबर ढोलकी, डफ आणि आणि हलगी कडाडणार आहे.**

जामगांव रस्त्यावरील मठामध्ये गुरूवार दि.२७ मार्च रोजी हा पुण्यतिथी सोहळा पार पडणार असून सदगुरू विचारांची देवाण घेवाण यावेळी होणार आहे. राज्याच्या विविध जिल्हयातून गुरूवारी शिष्यगण पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने एकत्र येणार आहे. बाजारपेठेतून सदगुरूंच्या प्रतिमेची मिरवणक काढण्यात येउन अध्यात्मिक भेदिक, भजने व कलगी तुऱ्याचा सामना या लोककलेच्या माध्यमातून पारनेकरांना यंदाही अनुभवण्यास मिळणार आहे.

या भक्ती सोहळयात दुपारी १२ ते ३पारखपदी सत्संग, भेदीक गायन व भजन, दुपारी ३ ते ६ शाहीरी जल्लोष, लेझीम व हालगीच्या निनादात सदगुरूंच्या प्रतिमेचा मिरवणूक, सायंकाळी ७ वाजता सदगुरू पादुकांचे पुजन व महाप्रसाद, रात्री ९ नंतर नामवंद शाहिरांच्या भेदिक भजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. या सोहळयाचा लाभ घेण्याचे आवाहन सदगुरू बबनदादा चौरे व अविनाश पारखपद समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रपंचासह परमार्थिक सुख

**प्रापंचिक जीवन जगताना गुरूज्ञानाचा वापर करून परमार्थिक सुख कशा प्रकारे अनुभवावे तसेच सदगुरूचा साधकाच्या जीवनात कसा लाभ होतो हे किसनबाबांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. आत्मज्ञानी गणपत बाबांच्या अध्यात्मिक कार्यात आपले आयुष्य समर्पित करून योग साधनेतून आनंदी जीवन कसे जगावे, त्यासाठी जीवनात सदगुरूंचे महत्व काय असते याची जाणीव त्यांनी आपल्या शिष्यगणांना करून दिली.**

### जातीभेद, अंधश्रध्देवर प्रहार

**समाजातील जातीभेद, अंधश्रध्दा, अनिष्ट चालीरीती दुर करण्यासाठी किसनाबाबांनी आपल्या गुरूपदाचा वापर करून शिष्यगणांना परमाथक सुखाची प्राप्त करून दिली. अहिल्यानगर जिल्हयासह कोल्हापुर, सातारा, सांगली, पुणे जिल्हयासह महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये शाहीरी बाण्यातून ढोलकी, डफ आणि तुणतुण्याच्या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मुलन तसेच समाज प्रबोधनपर कार्य करणारा अविनाश पारखपद समाज आहे**

# सुजित पाटलांना महामंडळाचे अध्यक्षपद द्या

## उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांची मागणी

**वासुंदे : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महामंडळाचे अध्यक्षपद देउन त्यांना जनसेवेची संधी देण्याची मागणी निघोजचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी केली.**

सुजित झावरे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वर वरखडे मित्र मंडळ, निवृत्ती वरखडे मित्र मंडळ यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पप्पू लामखडे, अर्जुन लामखडे, उमेश सोनवणे, रामदास रसाळ, नारायण लामखडे, सचिन लाळगे, संजय लामखडे, निवृत्ती वरखडे, बंटी लंके, गणपत रसाळ, स्वप्नील रसाळ, अर्जुन जाधव, शंकर रसाळ, कैलास लामखडे, रविंद्र लामखडे, सागर वरखडे, गणेश वरखडे, सुभाष रसाळ, सहादू लामखडे, शिवाजी लामखडे आदी उपस्थित होते.



### प्राधान्याने विचार करावा

**सत्ता असो अथवा नसो सतत सर्वसामान्यांसाठी झटणारे, विविध विकास कामे मार्गी लावणारे व्यक्तिमत्व म्हणून सुजित पाटलांची ओळख आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी सुजित झावरे यांच्या आजवरच्या कामगिरीचा विचार करून तालुक्याच्या विकासला गती येण्यासाठी आमच्या मागणीचा प्राधान्याने विचार करावा.**

**ज्ञानेश्वर वरखडे**
उपसरपंच, निघोज

यावेळी बोलताना उपसरपंच वरखडे म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती तसेच इतर सहकारी संस्थांच्या माध्यमातून झावरे यांचे पारनेर तालुक्याच्या विकासासाठी मोठे योगदान आहे. विधानसभा निवडणूकीत झावरे पाटील यांनी करिष्मा दाखविला आणि विरोधी उमेदवाराला पराभव पत्करावा लागला, राष्ट्रवादीचा उमेदवार विजयी झाला. सुजित पाटलांनी आजवर दिलेल्या योगदानाचा विचार करून त्यांना न्याय देण्याची आग्रही मागणी वरखडे यांनी केली.

# बबनराव लंके यांना ट्रस्टचे अध्यक्षपद द्या

## शिवाजीराव लंके यांची मागणी

**निघोज : प्रतिनिधी**



**निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष शांताराम मामा लंके यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदाची संधी त्यांचे बंधू बबनराव लंके यांना देण्याची मागणी मळगंगा यात्रोत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी केली आहे.**

लंके यांनी सांगितले की, निघोजच्या सामाजिक, धार्मिक कार्यात नेहमीच आघाडीवर असलेल्या लंके परिवाराचे मळगंगा देवस्थानसाठी मोठे योगदान आहे. निघोजच्या मळगंगा देवीचा यात्रोत्सव असो किंवा कोणतेही सामाजिक, धार्मिक काम असो शांताराम मामा किंवा बबनराव लंके यांनी कधीही अखडता हात घेतला नाही. त्यांनी त्यांच्या परिवाराच्या वतीने नेहमची योगदान दिलेले आहे.

त्यांच्या निवडीनंतर मळगंगा देवस्थानच्या कुंड पर्यटन क्षेत्राच्या विकासाआड येणाऱ्या अडचणी निश्चित दुर होतील असे निघोजकारांचा विश्वास आले. या गोष्टींचा विचार करता मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर बबनराव लंके यांना संधी देण्याची मागणी निघोज ग्रामस्थ तसेच बहुसंख्य सभासदांनी केली असल्याचे शिवाजीराव लंके म्हणाले.

### निघोजकरांचे लक्ष

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या प्रसादालयाची संकल्पना शांताराम मामा लंके यांचीच होती. ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यांनी स्वत: योगदान देत हे प्रसादालय सुरू करण्यात आले. मळगंगेचा यात्रोत्सव अथवा कोणत्याही धार्मिक कार्यक्रमात योगदान देणाऱ्या लंके परिवारातील बबनराव लंके यांच्या रूपाने अध्यक्षपद देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यास विश्वस्तांचा प्रतिसाद मिळतो का, त्यांना अध्यक्षपदाची संधी मिळणार का याकडे निघोजकारांचे लक्ष आहे.**

# शाश्वत पाण्यासाठी लढा उभारणार

## सुजित झावरे पाटील यांचा संकल्प

**वासुंदे : प्रतिनिधी**

**वर्षानुवर्षे दुष्काळाशी सामना करणाऱ्या बळीराजाला दिलासा देण्यासाठी संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शेतीसाठी शाश्वत पाणी मिळावे यासाठी आपण लढा उभारणार असल्याचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी सांगितले.**



आंतरराष्ट्रीय जल दिनाचे औचित्य साधून वासुंदे येथे शास्वत पाणी साठविण्यासाठी जलसंधारण चळवळीचा शुभारंभ तसेच शासनाच्या मृद जलसंधारण विभागामार्फत गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजनेअंतर्गत वासुंदे येथील सर्व पाझर तलाव, बंधारे, ओढे, नाले खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. पुण्याच्या संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने जलसंधारणाची कामे करण्यात येणार आहेत.

झावरे म्हणाले, आपण शास्वत पाण्यासाठी प्रयत्न करणार असून संपूर्ण तालुक्यासाठी हे काम करताना जनतेनेही आगामी काळात पाण्याचा सुयोग्य व नियोजनपुर्वक वापर करण्याचे आवाहन झावरे यांनी केले. नदीजोड प्रकल्प, बंधाऱ्यांच्या माध्यमातून पाणी आडविण्याचे काम करण्यात येत आहे. आगामी काळात तांबडीकार प्रकल्प, पठार भागावर पाणी पोहचविण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार असल्याचे झावरे म्हणाले. या प्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य, वासुंदे सेवा संस्थेचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रा. चेमटे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार; ३३ वर्षांच्या शैक्षणिक कार्याची दखल



**भाळवणी : प्रतिनिधी**

**टाकळी खातगाव येथील हनुमान शैक्षणिक संकुलाचे उपप्राचार्य प्रा.केशव चेमटे यांना राज्यस्तरीय कृतिशील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

केडगाव (अहिल्यानगर) येथील जय मल्हार शैक्षणिक संस्था व यशवंत सेना यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.प्रा.चेमटे गेल्या ३३ वर्षांपासून टाकळी खातगाव येथील हनुमान शैक्षणिक संकुलात अध्यापन करीत आहेत. विद्यार्थीप्रिय असणारे प्रा.चेमटे यांना आजपर्यंत विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

हा पुरस्कार अध्यक्ष कांतीलाल जाडकर,माधव गडदे, यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय तमनर, ज्योती उनवने, रामचंद्र थोरात, नानासाहेब डोंगरे, थोरात महाराज यांच्या हस्ते देण्यात आला.या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाशजी बोरा, प्राचार्य सुभाष नरवडे, पर्यवेक्षक जालिंदर नवले,प्रा.दिलीप बाक्क्षे, रावसाहेब नजन, मच्छिंद्र साबळे, बाळासाहेब खिल्लारी,संजय दाते आदींसह ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# इफ्तार पार्टीत धर्मनिरपेक्षतेवर चर्चा

## लोकशाही जागर समिती, पठारे विचार मंचचा उपक्रम

**पारनेर : प्रतिनिधी**



**मुस्लिम समाजाच्या सध्या सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून शहरातील संविधान लोकशाही जागर समिती, खा. नीलेश लंके मित्र परिवार तसेच मार्तंडनाना पठारे विचार मंचच्या संयुक्त विद्यमाने मुस्लिम बांधवांना इफ्तार पाट देण्यात आली. या पार्टीमध्ये संविधानातील धर्मनिरपेक्षता या मुल्याविषयी चर्चा घडवून संविधानाबाबत माहिती देण्यात आली.**

यावेळी बोलताना सचिन नगरे यांनी सांगितले की, संविधानातील धर्मनिरपेक्षता तत्व म्हणजे भारत एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे. याचा अर्थ राज्य कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य देत नाही, तर सर्व धर्मांना समान वागणूक दिली जाते. आणि लोकांना त्यांच्या आवडीनुसार कोणताही धर्म पाळण्याचा पुर्ण अधिकार आहे. भारतीय राज्य संस्थेचा कोणताही धर्म नाही, याचा अर्थ राज्य कोणत्याही धर्माला अधिकृत किंवा प्रोत्साहन देत नाही. राज्य सर्व धर्मांना समान माणून वागते आणि कोणत्याही धर्मावर अधारीत भेदभाव करत नसल्याचे नगरे यांनी यावेळी सांगितले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. रफीक सय्यद यांनी रमजान महिन्याचे महत्व विषद केले. सामाजिक संस्थांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीविषयी डॉ. सय्यद यांनी समाधान व्यक्त केले.
यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.आर.जी.सय्यद, संविधान व लोकशाही जागर समितीचे अध्यक्ष सचिन नगरे, खा. नीलेश लंके मित्र परिवाराचे पारनेर शहराध्यक्ष दादा शेटे, मार्तंडनाना विचार मंचचे रामदास पठारे, अॅड. सचिन पठारे, योगेश गंधाडे, भैरवनाथ शिक्षण संस्थेचे सचिव तुषार सोनवणे, नाना रेपाळे यांच्यासह यावेळी मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# माजी विद्यार्थी महाविद्यालयाचा आरसा

## भाऊसाहेब डेरे यांचे प्रतिपादन । अळकुटी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा



**अळकुटी : प्रतिनिधी**

**महाविद्यालयाच्या जडणघडणीत आणि विकासामध्ये माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्वाची असते. त्यामुळे माजी विद्यार्थी हा महाविद्यालयाचा समाजातील आरसाच असतो असे प्रतिपादन स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य भाऊसाहेब डेरे यांनी केले.**

अळकुटी येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यलयातील माजी विद्यार्थी संघाच्या वतीने माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून डेरे हे बोलत होते.
यावेळी बोलताना डेरे म्हणाले, महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण करून विद्यार्थी पदवी प्राप्त करतात. हेच पदवीधारक विद्यार्थी पुढे समाजाचे आदर्श नागरीक म्हणून काम करतात. उच्चशिक्षित युवा वर्ग हा समाजाचा कणा असतो. महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाशी ऋणानुबंध कायम राहतात. हेच ऋणानुबंध अधिक घट्ट करण्यासाठी या स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे डेरे यांनी सांगितले. महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्वाची असते असे प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.
यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संग्राम पावडे, गीताराम शिंदे, ज्ञानेश्वर पानमंद, निशा गोरडे यांच्यासह डॉ. शांता थोरात, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, माजी विद्यार्थी गोरख घोलप, शुभम परंडवाल, प्रतीक वरखडे, आरती लोणकर, अभिषेक फुले, सुदर्शन भांबेरे, विशाल दाते यांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी उपप्राचार्य अमोल नालकर, प्राध्यापक सर्वश्री सुषमा करकंडे, संजय जाधव, रावसाहेब झावरे, संदीप गेटम, पोपट सुंबरे, पूजा वैरागर, सुनीता जाधव, विनायक सोनवणे, दत्तात्रय शेळके, अनुराधा गाढवे, स्वाती फापाळे, दशरथ पानमंद, प्रियंका दिवटे, शर्मिष्ठा बोरूडे, पांडूरंग उघडे, मोहन माने सचिन बलसाने, ऋषिकेश गीते, राजाराम गोरडे यांच्यासह सुनीता भालेराव, छाया म्हस्के, विकास योनवणे, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंग्ध्वज आदी उपस्थित होते.सुषमा करकंडे यांचीन परिचय, विशाल रोकडे यांनी सुत्रसंचलन तर दत्तात्रय शेळके यांनी आभार मानले.

# सामाजिक योगदानातून नातीच्या लग्नाचा आनंद द्विगुणीत!

## ■ झावरे आजी-आजोबांचा कौतुकास्पद उपक्रम ■ विविध उपक्रमांसाठी ५० हजाराच्या देणग्या

**निघोज : प्रतिनिधी**

**नातवंडांचा विवाह हा आजी-आजोबांसाठी भाऊक तितकाच आनंदाचा क्षण. हाच आनंद द्विगुणीत करण्यासाठी निघोज येथील निवृत्त मुख्याध्यापक पोपटराव झावरे व निवृत्ती शिक्षिका आशा झावरे यांनी नात वैभवी हिच्या विविहानिमित्त विविध उपक्रमांना ५० हजारांची मदत करत सामाजिक बांधिलकी जपली.**



दत्तात्रय झावरे यांची कन्या वैभवी व शिवसेना नेते शिवाजी लाळगे यांचे चिरंजीव आकाश यांचा विवाह नुकताच निघोज कुंड परिसरात पार पडला. या विवाहात वैभवीच्या आजी आजोबांना सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श ठेवला.
मा. आमदार अशोक धात्रक, जि.प.चे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे, अमृताशेठ रसाळ, ज्ञानदेव लंके, डॉ. भास्कर शिरोळे, डॉ. श्रीकांत पठारे, बबनराव लंके, सचिन वराळ यांच्या हस्ते विविध उपक्रमांना या देणग्या देण्यात आल्या.

यावेळी बोलताना मा. आ. अशोक धात्रक म्हणाले, लाळगे व झावरे हे दोन्ही परिवार सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य असून धार्मिक कार्यक्रमांसाठीचे त्यांचे योगदान कौतुकास्पद आहे. दोन्ही कुटूंबाचा समाजाभिमुख वारसा वधू वरांनी जपण्याचे आवाहन त्यांनी केले.
समाजाचे आपण देणे लागतो या भावनेतून काम करणारी ही दोन्ही कुटूंब आहेत. सामाजिक, धार्मिक कामात योगदान देत त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपल्याचे सुजित झावरे म्हणाले.

### या उपक्रमांसाठी देणगी

**कुंड माऊली दिंडी सोहळ्याच्या पंढरपुर येथील इमारत बांधकामासाठी २५ हजार, मळगंगा ट्रस्टच्या प्रसादालयास १० हजार, गाय-गुराखी या धार्मिक उपक्रमासाठी ५ हजार, भोंद्रे येथील बाल संस्कार शिबिरासाठी १० हजार अशी एकूण ५० हजार रूपयांची देणगी यावेळी झावरे आजी-आजोबांकडून देण्यात आली.**

### कौतुकास्पद आणि अनुकरणीय

**मळगंगा मंदिर, श्रीराम मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताह तसेच मळगंगा ट्रस्टच्या प्रसादालयासाठी मदत यासाठी लाळगे व झावरे परिवाराने नेहमीच मदतीचा हात दिला आहे. नातीच्या विवाहाचे औचित्य साधून झावरे आजी-आजोबांनी जपलेली सामाजिक बांधिलकी निश्चित कौतुकास्पद असून अनुकरणीय आहे.**

**अमृताशेठ रसाळ,**
मळगंगा कन्स्ट्रक्शन

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com